जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांचे
कार्यमूल्यमापन अहवाल प्रतिवेदन/
पुनर्विलोकनाबाबत...

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः गोपअ-२०१८/(प्र.२३ /२०१८)/गो.का.

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २७ एप्रिल, २०१८

वाचा :

१) **सा.प्र.विभाग, शासन निर्णय क्रमांकः सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १ नोव्हेंबर,२०११.**
२) **जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः गोपअ-२०१३/(प्र.३७/१३)/गो.का. दिनांक २२ जुलै, २०१३**
३) **सा.प्र.विभाग, शासन निर्णय क्रमांक: सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१८**

परिपत्रक :

गोपनीय अहवाल हा शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी संदर्भातील अत्यंत महत्वाचा दस्तऐवज आहे. त्यामुळे गोपनीय अहवाल विहित कालावधीत लिहिणे व जतन करणेबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १ नोव्हेंबर,२०११ अन्वये महत्वाच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने उचित अशा मार्गदर्शक सूचना या विभागाच्या उपरोक्त दिनांक २२ जुलै,२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या आहेत.

२. सामान्य प्रशासन विभागाने, शासन निर्णय, क्रमांक: सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये सर्व राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यमूल्यमापन अहवालात एकसमानता असावी, यासाठी सध्या प्रचलित असलेला कार्यमूल्यमापन अहवालाचा नमुना सुधारित केला असून, सन २०१७-१८ या वर्षापासून लागू केला आहे. त्याचप्रमाणे जलसंपदा विभागातील पदांच्या आढाव्याच्या वेळी क्षेत्रिय स्तरावरील काही अधिकाऱ्यांच्या पदनामात / कार्यालयांच्या नांवात बदल केला आहे. त्यामुळे दिनांक २२ जुलै, २०१३ च्या परिपत्रकान्वये प्रसृत यादीतील प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास) आणि सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि) हे ज्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन व पुनर्विलोकन करतील अशा अधिकाऱ्यांच्या कार्यमूल्यमापन अहवालांच्या प्रतिवेदन व पुनर्विलोकनाबाबत सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यास्तव संदर्भाधीन क्र.२ येथील परिपत्रक अधिक्रमित करुन याद्वारे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे वार्षिक कार्यमूल्यमापन अहवाल विहित कालावधीत प्रतिवेदित/ पुनर्विलोकित करुन घेण्याच्या अनुषंगाने सोबतच्या परिशिष्ट “अ” नुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत, त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास), सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि) आणि सचिव (प्रकल्प समन्वय) हे ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यमूल्यमापन अहवालांचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन करतील अशा अधिकाऱ्यांची यादी परिशिष्ट “ब” मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

५. या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन, सन २०१७-१८ या प्रतिवेदन वर्षापासून संबंधितांच्या कार्यमूल्यमापन अहवालासंदर्भात प्रतिवेदन/पुनर्विलोकनाची कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४२७१६०४२१५५२७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Jagdish Sajanikar

Digitally signed by Prashant Jagdish Sajanikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a8cd67058795ac5a961c2b41207cb6d24b79e17716af754c9fc40fd4145416f1, serialNumber=217003e42c820ec29c89162937f98929453cc6295b34f71ea285041053a66aa7, cn=Prashant Jagdish Sajanikar
Date: 2018.04.27 16:07:37 +05'30'

(प्र. ज. साजणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व कार्यकारी संचालक/महासंचालक, जलसंपदा विभाग.
२. सर्व सहसचिव/उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,
३. सर्व मुख्य अभियंता व सह सचिव / अधीक्षक अभियंता तथा उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,
४. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
५. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
६. सर्व अवर सचिव/ कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय
७. गोपनीय कार्यासन संग्रहार्थ

(शासन परिपत्रक क्रमांक : गोपअ-२०१८/प्र.२३ /२०१८/गो.का., दि. २७ एप्रिल, २०१८ सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-अ

१) सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक ७ फेब्रुवारी,२०१८ च्या शासन निर्णयान्वये गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवालाचा सुधारित नमुना निश्चित केला आहे. सदर अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल “महापार” (MahaPAR) या संगणक प्रणालीद्वारेच नोंदविण्यात यावेत.

२) तसेच अधिकाऱ्यांच्या कार्यमूल्यमापन अहवालामध्ये गुणांकन नमूद करतांना, शेरे वा प्रतिकूल शेरे नोंदवितांना, त्या पुष्ठयर्थ ठोस कारणे वा अन्य माहितीसंदर्भात आवश्यक त्या नोंदी असलेले कच्चे टिपण (Ephemeral Roll), यथास्थिती प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी स्वत:जवळ ठेवावे.

३) सिंचनाचे काम करणाऱ्या अभियंत्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल प्रतिवेदित/ पुनर्विलोकित करतांना-

- सिंचनाचा वापर,
- पाणीपट्टी आकारणीचे उद्दिष्ट व वसुली,
- त्या वर्षातील पाणी वापर संस्थांची निर्मिती/पाणी वापर संस्थांना हस्तांतरण केलेले सिंचन क्षेत्र,
- प्रत्येकवर्षी देण्यात आलेले सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट व साध्य इ. निकष विचारात घेऊन मूल्यमापन करण्यात यावे.

४) कार्यमूल्यमापन अहवाल प्रतिवेदित/पुनर्विलोकित करतांना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.

१) प्रलंबित प्रकरणांचा निपटारा
२) खर्चाची आर्थिक व भौतिक उद्दिष्टपूर्ती
३) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही
४) विधीमंडळातील प्रलंबित आश्वासनांचा निपटारा
५) न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा
६) लोकलेखा समितीच्या/महालेखापालांच्या परिच्छेदांचा निपटारा
७) विभागामार्फत जनसामान्यांना दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर.

(शासन परिपत्रक क्रमांक : गोपअ-२०१८/प्र.२३/२०१८/गोका, दि. २७ एप्रिल, २०१८सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट- ब

जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्यमूल्यमापन अहवालासंदर्भात प्रतिवेदन/ पुनर्विलोकन अधिकाऱ्यांची यादी.

अ.क्र.	पदनाम	प्रतिवेदन अधिकारी	पुनर्विलोकन अधिकारी
१	कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
२	कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
३	कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
४	कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
५	कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
६	महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)	मुख्य सचिव
७	मुख्य अभियंता (द.व प्र.) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
८	मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
९	मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)	मुख्य सचिव
१०	मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
११	मुख्य अभियंता, (स्थापत्य) जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)	मुख्य सचिव

१२	मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)	मुख्य सचिव
१३	सह / उप सचिव (सेवा)	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
१४	आंतर वित्त सल्लागार व सह / उप सचिव	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
१५	सह / उप सचिव (आस्था)	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)	मुख्य सचिव
१६	सह / उप सचिव (प्रशा)	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)	मुख्य सचिव
१७	अधीक्षक अभियंता व सचिव, आंतर राज्य नियंत्रण मंडळ, नागपूर	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)	मुख्य सचिव
१८	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव	कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
१९	मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, औरंगाबाद	कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
२०	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद	कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
२१	मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक	कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
२२	मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग, मुंबई	कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
२३	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे	कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
२४	मुख्य अभियंता (वि.प्र.), जलसंपदा विभाग, पुणे	कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
२५	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर	कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)

२६	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती	कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
२७	मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, नागपूर	कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
२८	मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती	कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
२९	मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक	महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
३०	मुख्य लेखा परिक्षक जल व सिंचन, औरंगाबाद	महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
३१	मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान प्रकल्प, नाशिक	महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
३२	अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नांदेड	मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
३३	अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ , पुणे	मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
३४	अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ , कोल्हापूर	मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
३५	अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ , नागपूर	मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
३६	अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नाशिक	मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
३७	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उपसचिव (मोप्र-१)	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)

३८	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उपसचिव (मोप्र-२)	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
३९	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उपसचिव (लपा)	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
४०	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उपसचिव (निवसं)	मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
४१	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उपसचिव (जसं)	मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
४२	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उपसचिव (जवि)	मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
४३	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उपसचिव (सिंव्य)	मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
४४	अधीक्षक अभियंता व पदसिध्द उपसचिव (लाक्षेवि)	मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
४५	अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंत्रालय, मुंबई. (जुने नांव-म.ज.सु.प्र, मंत्रालय, मुंबई)	मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
४६	अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद, पुणे	मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
४७	अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे	महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
४८	अधीक्षक अभियंता, विदर्भ ज.वि.व उ.सिं.प्र.मंडळ, नागपूर	मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)

४९	अधीक्षक अभियंता, कोयना (विवयां) संकल्पचित्र मंडळ, पुणे	मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
५०	अधीक्षक अभियंता, तापी गोदावरी जलविद्युत उपसा सिंचन मंडळ, जळगांव (जुने नांव घाटघर (वि.व यां.) मंडळ, कळवा, ठाणे)	मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
५१	अधीक्षक अभियंता, बांधकाम मंडळ, कोल्हापूर	मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
५२	अधीक्षक अभियंता, कोयना संकल्प चित्र मंडळ, पुणे	मुख्य अभियंता, (स्थापत्य) जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
५३	अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे	मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
५४	अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद	मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
५५	अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, नागपूर	मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
५६	अधीक्षक अभियंता खारभूमी विकास मंडळ, ठाणे	मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग, मुंबई	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
५७	अधीक्षक अभियंता, दक्षता पथक,ठाणे,	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
५८	अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे,	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
५९	अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, नागपूर,	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
६०	अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती,	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)

६१	अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद.	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
६२	अवर सचिव (गृ.व्य.)	सह / उप सचिव (सेवा)	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
६३	अवर सचिव (सेवा)	सह / उप सचिव (सेवा)	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
६४	अवर सचिव (विधी)	सह / उप सचिव (सेवा)	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
६५	अवर सचिव (क्षे.प्र.)	सह / उप सचिव (सेवा)	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
६६	अवर सचिव (अर्थ)	आंतर वित्त सल्लागार व सह / उप सचिव	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
६७	सहायक संचालक (लेखा)	आंतर वित्त सल्लागार व सह / उप सचिव	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
६८	अवर सचिव (राकसे)	सह / उप सचिव (प्रशा)	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
६९	अवर सचिव (संनि)	सह / उप सचिव (प्रशा)	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
७०	अवर सचिव (दक्षता)	सह / उप सचिव (आस्था)	प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)
७१	अवर सचिव (आस्था)	सह / उप सचिव (आस्था)	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
७२	अवर सचिव (कामगार)	सह / उप सचिव (आस्था)	सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)
७३	कार्यकारी अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष, पुणे	अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष, पुणे	मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
७४	कार्यकारी अभियंता दक्षता पथक, ठाणे, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद.	संबंधीत अधीक्षक अभियंता, दक्षता पथक	मुख्य अभियंता (द.व प्र.)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
७५	ज्या पथकातील/ कार्यालयातील उप अभियंता व तत्सम अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचे लगतचे प्रतिवेदन अधिकारी नसतील अशा अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल त्यांचे वरिष्ठ अधिकारी (अधीक्षक अभियंता/ मुख्य अभियंता) प्रतिवेदनासह पुनर्विलोकित करतील.		
